गुरुवार दि.२९ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३५९
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com


# समोरुन अफजल येतील,पण आम्ही लढायला तयार-आदित्य ठाकरे

## मिंधे सरकारने कॉन्ट्रक्ट नेमकं कोणाला दिले? ;शिंदे पिता-पुत्रावरही निशाणा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंधुदुर्ग । (वृत्तसंस्था)

मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा काही दिवसापूर्वी कोसळला. त्यानंतर राज्यभरात शिवप्रेमींकडून संताप व्यक्त केला जात आहे. आज महाविकास आघाडीने मालवण येथे मोर्चा काढला. यावेळी ठाकरे गट आणि राणे समर्थक आमने-सामने आले. दरम्यान, दोन तासांनंतर किल्ल्यावरुन आदित्य ठाकरे बाहेर पडले. मोर्चास्थळी दाखल झाल्यानंतर भरपावसात भाषण करत महायुती सरकारसह मोदी शहांवर निशाणा साधला.मोर्चावेळी मालवणमध्ये मुसळधार पावसाला सुरुवात झाली. या पावसातच आमदार आदित्य ठाकरे यांनी भाषणाला सुरूवात केली. आपल्या मोर्चामध्ये काही चिंधीचोर आले, मी त्यांच्याकडे जास्त लक्ष देत नाही. आज बालिशपणा होत होता. हा भाजपचा भ्रष्टाचार आहे. इकडचे स्थानिक खासदार कसे जिंकूण आले आहेत आपल्याला माहिती आहे, असा टोलाही आदित्य ठाकरे यांनी खासदार नारायण राणे यांना लगावला.



आदित्य ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, महाराजांच्या किल्ल्याच्या कामात या ठिकाणी भ्रष्टाचार झाला असेल तर आपण तिथं गेलं पाहिजे. आपण या मातीतील लोक आहोत. ही परिस्थिती देशात आहे. दहा वर्षात भाजपाने जी काम केली आहेत, त्या कामाला गळती लागली आहे, असा आरोपही आदित्य ठाकरे यांनी केला.आदित्य ठाकरे पुढे म्हणाले की, देशात कोणताही एक भाग सोडलेला नाही जिथे भाजपाने भ्रष्टाचार केलेला नाही. मुंबईची मेट्रो असो, मुंबई महापालिकेतील घोटाळे असो. अयोध्येमधील राम मंदिरातही गळती लागली आहे. या कामाची जगभराच जाहीरात केली. नवीन संसद भवनातही पाणी गळत आहे. दिल्ली विमानतळाचे छतही पडले.

मालवण येथील या पुतळ्याचे कॉन्ट्रक्ट भाजपाने मिंधे सरकारने कोणाला दिले होते. हे जगासमोर आलं पाहिजे. कोण होते हे आपटे? कोणताही अनुभव नसताना तुम्ही हे काम कसं दिलं. अमेरिकेतली एक पुतळा समुद्र किनारी १३८ वर्षे टीकला आहे. पण आपला हा पुतळा ८ महिन्यात कसा कोसळला? हे आपटे कोण आहेत कुठे आहेत हे आम्हाला कळालं पाहिजे. तो आपटे कुणाचा तरी मित्र आहे म्हणून त्यांना काम मिळालं. याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे, असा प्रश्न करत आदित्य ठाकरे यांनी एकनाथ शिंदे व श्रीकांत शिंदे यांच्यावर देखील निशाणा साधला.आदित्य ठाकरे म्हणाले, आम्ही चार वर्षापूर्वी संभाजीनगर येथील विमानतळाला छत्रपती संभाजी महाराज विमानतळ हे नाव दिलं आहे, पण मोदी सरकारने अजूनही या नावाला मान्यता दिलेली नाही. यांचा महाराष्ट्रातील या नावांचा विरोध का आहे? यांचा महाराष्ट्रद्वेष का आहे?, असा आरोपही ठाकरे यांनी केला. समोरुन अनेक अफजल येतील, ईडी, सीबीआय आणतील पण आम्ही झुकणार नाही हे सांगा, आम्ही लढायला तयार आहे, असं सांगत आदित्य ठाकरे यांनी चॅलेंज दिलं

# स्टेट बँक ऑफ इंडिया च्या मनमानी कारभारा मुळे लाडक्या बहिणीचे हाल-प्रा.वसंत मापारी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार सरोवर । विनायक कुटे

लाडकी बहिण योजना सुरू करून महाराष्ट्र सरकारने राज्यातील गोरगरीब महिला साठी प्रति महिना पंधराशे रुपये अशी योजना जाहीर करून अर्ज स्वीकारून लागलीच एक कोटी महिलांच्या खात्यात दोन महिन्याचे ३००० रुपये जमा केले पण स्टेट बँकेत खाते असणाऱ्या बऱ्याच महिलांना खात्यात पैसे आले नाही त्याचे कारण विचारले असता आधार सिडिंग नसल्याने पैसे खात्यात जमा झाले नाही त्यामुळे आधार सिडिंग करण्यासाठी व आधार लिंक, शज्ञूल करण्यासाठी एकच गर्दी स्टेट बँकेच्या आवारात उसळली, काही



महिला सकाळी ७ वाजल्यापासून रांगेत उभे राहून ताटकळत आहेत, त्यामुळे त्यांचा रोजगार बुडत असून व शारीरिक व मानसिक त्रास होत आहे तसेच या गर्दीमुळे इतर व्यावसायिक व शेतकरी, नोकरदार लोकांचेही काम होत नसून बँक कर्मचाऱ्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे. वास्तविक ज्या दिवशी बँकेत खाते उघडले त्याच वेळी आधार कार्ड, पॅन कार्ड, व इतर तांत्रिक गोष्टी बँक प्रशासन यांनी पूर्ण करून घ्यायला पाहिजे, वारंवार ग्राहकांना शज्ञूल साठी व इतर तांत्रिक गोष्टी साठी त्रास देऊन हकनाक जनतेला त्रास होत आहे असा सूर सामान्य जनतेतून निघत आहे, संबंधित प्रशासनाने या बाबीची गंभीर दखल घेऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्या अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रा वसंत मापारी यांनी केली आहे.

# आष्टीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जनसन्मान यात्रा

### मतदार संघातील शेतकरी, महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहाण्याचे आ. आजबेंचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजित पवार गटाची सध्या राज्यभर जनसन्मान यात्रा सुरू आहे. हि यात्रा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार (दि.२९) दुपारी तीन वाजता आष्टी विधानसभा मतदार संघात येत आहे. या याचेच आष्टी शहरात जंगी स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर मोरेश्वर मंगल कार्यालयात शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाव्याला आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघातील शेतकरी, महिला, युवक-युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन मतदार संघाचे आ.बाळासाहेब आजबे यांनी केले आहे.



आष्टी येथील आ.बाळासाहेब आजबे संपर्क कार्यालयात मंगळवार (दि.२७) रोजी सकाळी ११ वा. पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेत आ. आजबे बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) चे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.पुढे बोलतांना आ. बाळासाहेब आजबे म्हणाले की, लाडकी बहिण योजनेने खेड्यातील गोर-गरीब कुटूंबीयांना आधार मिळाला आहे.हि योजना कायम स्वरूपी टिकणारी असल्याचेही आ. आजबे यांनी सांगितले. तसेच या मेळाव्याला उपमुख्यमंत्री अजित पवार,प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे,माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल हे मार्गदर्शन करणारआहेत.या मेळाव्याला आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघातील शेतकरी, महिला, युवक- युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मतदार संघाचे आ. बाळासाहेब आजबे यांनी केले आहे.



अहिल्यानगर येथे दिनांक २५ ऑगस्ट रोजी पार पडलेल्या वंजारी महासंघाचे दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनात संपादक बुधवत यांना प्रदान करण्यात आलेल्या राष्ट्रसंत भगवान बाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भूषण पुरस्कारानिम्मित दि. २८ रोजी शिक्षक पेशातील मित्र दत्तात्रय कायंदे यांनी सिंदखेड राजा येथे आले असता लोकनेता कार्यालयात भेट घेऊन सत्कार केला या वेळी दिलीप पवार व आदी. मा. उपस्थित होते... (छाया:- लोकनेता न्युज नेटवर्क मातृतीर्थ सिंदखेड राजा)

# श्रीपाद जोशी व संदीप देशमुख यांनी स्मशानभूमी व्हावी यासाठी तहसीलदार यांना आंदोलनाचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

चारठाणा । प्रतिनिधी

येथील हिंदू धर्मातील जाती उपजातीसाठी सार्वजनिक स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून द्या या मागणीसाठी चारठाणा येथील तरुणांनी जिंतूर तहसीलदार राजेश सरवदे निवेदन यांच्याकडे देण्यात आले. दरम्यान स्मशानभूमीसाठी लवकरच योग्य तो तोडगा काढला जाईल, असे आश्वासन त्यावेळी तहसीलदार साहेब यांनी दिले.

येणारा माणूस कधी ना कधी जाणारच कोणाचाही मृत्यू दु: खद असला तरी त्याच्या अंतिम निरोपाची जागा ही मिळायलाच हवी

मरणाऱ्या माणसाचा शेवट हा स्वच्छ जागेत व त्या प्रेताची न होता त्याचा अंत्यसंस्कार व्हावा. या हेतूने



चारठाणा येथील तरुण श्रीपाद जोशी आणि संदीप देशमुख यांनी तहसील दार यांना निवेदन देऊन चारठाणा येथे लवकरात लवकर स्मशानभूमी उपलब्ध करून द्या अशी मागणी घातली.

यात असे नमूद करण्यात आले आहे की, हिंदू धर्मातील एखादी व्यक्ती मृत पावल्यास मृतदेहाचा अंत्यसंस्कार करण्यासाठी जागा उपलब्ध होताना अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे त्यासाठी आवश्यक असलेली जागा उपलब्ध करून देण्यात यावी तसेच आवश्यक सोयी सुविधा ही देण्यात याव्या, अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे. गेले अनेक वर्ष चारठाणा येथील नागरिक उघड्यावर अंत्यसंस्कार करतात ते करत असताना अचानक पाऊस येणे अशा गोष्टी घडतात व त्या प्रेताची अवहेलना होते गेले अनेक वर्षापासून श्रीपाद जोशी व संदीप देशमुख हे स्मशानभूमी करण्यात यावी यासाठी जिल्हा अधिकारी तहसीलदार यांच्याकडे अनेक वेळा निवेदन देऊन त्यांनी त्यावर कुठलीही कार्यवाही केली नाही यावेळी अर्जामध्ये त्यांनी आंदोलनाचा इशारा तहसीलदार यांच्यामार्फत दिला आहे.

### ज्यांना पक्ष सोडून जायचे आहे, त्यांनी खुशाल जाव-चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई (वृत्तसंस्था)**-ज्यांना पक्ष सोडून जायचे आहे, त्यांनी खुशाल जावे. भाजप कुणालाही अडवणार नाही. पण त्यांनी थोडा संयम ठेवला तर पक्ष निश्चितच काहीतरी निर्णय घेईल, अशा शब्दांत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपला सोडचिठ्ठी देऊन महाविकास आघाडीतील घटकपक्षांत जाण्याच्या तयारीत असणाऱ्या नेत्यांना खडेबोल सुनावलेत. त्यांचा रोख माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्याकडे होता.पुणे जिल्ह्यातील इंदापूर विधानसभेच्या उमेदवारीवरून महायुतीत रणकंदन माजले आह.

## चारोळी

उगाच पोकळ अपेक्षा कशास
जीवनी रंग स्वतःच भरावा
खडतर वाटा येतच राहतील
सुविचारांचा नको दुरावा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी यांच्या हस्ते कृषी संजीवनी नर्सरी चे उद्घाटन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

दि.२७ ऑगस्ट २०२४ रोजी नायगाव तालुक्यातील मोकासदरा येथिल नवयूवक तरुण विश्वजीत जाधव यांनी कृषी संजीवनी नर्सरी उद्योग व्यवसाय उभा केला त्यांच्या नविन व्यवसाय उद्घाटनप्रसंगी मारोतराव कवळे गुरुजी यांनी उपस्थित राहून शूभेच्छा दिल्या यावेळी, उमरी मार्केट कमिटी संचालक बापुराव पाटील करकाळेकर,धर्माबाद मार्केट कमिटी माजी संचालक अशोक पाटील वडजे,भाजपा जिल्हा प्रवक्ते शिवराज पाटील गाडीवान, श्रीनिवास पाटील ढगे,मोकासदरा गावाचे सरपंच बळवंत पाटील, हायटेक चे शितल



पाटील, आनंदराव पाटील जाधव, नागोराव पाटील जाधव, शेषेराव पाटील जाधव,राम पाटील जाधव,भारत पाटील जाधव, रमेश पाटील गुंतापले,हरी पाटील जाधव,सह मोकासदरा गावातील असंख्य शेतकरी बांधव उपस्थित होते.










# खासदार वसंतराव चव्हाण यांचा शासकीय इतमामात अखेरचा निरोप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

नांदेड जिल्ह्याचे काँग्रेसचे खासदार माननीय वसंतराव चव्हाण साहेब यांचा दिनांक २६ ऑगस्ट रोजी हैदराबाद येथील किम्स रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली . सोमवारी त्यांनी पहाटे च्या सुमारास मंजुशी झुंज अपयशी ठरली. खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनाने राजकीय वर्तुळात मध्ये हळहळ व्यक्त केल्याजात आहे यकृतामध्ये इन्फेक्शन झाल्यामुळे त्यांना शासकीय रुग्णालय नांदेड येथे दाखल करण्यात आले होते मात्र त्यांना श्वास घेण्यात त्रास व कमी रक्तदाबाचा त्रास होत होता असे डॉक्टरांनी सांगितले होते त्यामुळे नांदेड येथून अंबुलन्सने हैदराबाद येथे हलवण्यात आले होते त्यांच्यावर गेल्या आठ दिवसापासून हैदराबाद येथील किम्स रुग्णालयात उपचार चालू होता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे त्यांच्या अशा अचानक नितनामुळे गोरगरीब जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात शोकाकुल व्यक्त केले जात आहे नायगावचे सरपंच ते पंचायत समिती सदस्य जिल्हा परिषद सदस्य विधानसभा सदस्य विधान परिषद सदस्य तथा लोकसभेचे सदस्य असे विविध पद भूषवणारे नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार दिनांक २७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता शासकीय इंतमामा नायगाव येथे अंत्यसंस्कार संस्कार करण्यात आला आहे यावेळी नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, अशोकराव चव्हाण, भास्करराव पाटील खतगावकर, आ. मोहनअण्णा हंबर्डे, माजी आ.राम पाटील रातोळीकर, दिलिप पाटील बेटमोगरेकर मीनलताई खतगावकर , माधव आप्पा बेळगे, बिलोली काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवाजी पाटील नायगावचे तहसीलदार नायगावचे पोलीस निरीक्षक तसेच नांदेड जिल्ह्यातील सामाजिक राजकीय विविध क्षेत्रातील जनसमुदाय उपस्थित होता.



## अखेर मृत्यु जिंकला !!

नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार वसंतरावजीचव्हाण साहेब हे गेले अनेक दिवसांपासून असाध्य व दिर्घ आजाराशी सकारात्मक पणे झुंज देत होते पण आज अखेर हि झुंज अपयशी ठरली, व सर्वांच्या मनाला चटका लावून गेली. आपल्या जीवनातील अनेक दुःखाचे डोंगर सहजपणे पेलवत , जिल्ह्यातील प्रत्येक कुटूंबात जिव्हाळ्याचे नाते निर्माण करणारे , प्रत्येकाच्या सुख दुःखात अग्रेसर पणे सहभागी होऊन कार्य पूर्णत्वास नेणारे , जिल्ह्यातील एक सर्वसमावेशक नेतृत्व नांदेड जिल्हयानी आज गमावले , हि झीज आमच्यासाठी क्राँग्रेस पक्षासाठी कधीही न भरून येणारी आहे . शेवटी आज आम्ही सगळ्यात मोठा आधार गमावला !! त्यांच्या स्मृतीश शतशः नमन ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो हीच प्रार्थना !! भावपूर्ण श्रध्दांजली

**–मा. हानमंत पाटील,बेटमोगरेकर परिवार माजी आमदार मुखेड**

“ काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार तथा विद्यमान खासदार कै.वसंतरावजी चव्हाण साहेब यांचे अकस्मिक निधन झाल्यामुळे नांदेड जिल्ह्यामध्ये फार मोठी दरी निर्माण झाली आहे. मनमिळावु शांत व संयमी स्वभावाचे कै.वसंतरावजी चव्हाण साहेब गावच्या सरपंचापासून ते नांदेड जिल्ह्याचे खासदारापर्यंत आपल्या आयुष्याच्या कारकिर्दीमध्ये अनेक पदे भूषविली. नायगावला तालुक्याचा दर्जा देण्यामध्ये व शहराला नाविन्यपूर्ण रूप आणण्यामध्ये खासदार वसंतरावजी चव्हाण साहेबांचे महत्त्वाचा वाटा आहे.त्यांच्या अशा अचानक जाण्यामुळे काँग्रेस पक्षामध्ये फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

**–मा.मारोती गंगाधर राहिरे ,भाजपा जिल्हा सचिव**

## धक्कादायक, वेदनादायी अन् दुःखद!

नांदेड जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक पटलावरील अनुभवी विद्यमान खासदार आदरणीय वसंतरावचव्हाणसाहेब यांच्यावर उपचार सुरू असतानाच अचानक तब्येत बिघडून आज पहाटे ५.३० वाजता हैदराबाद येथील किम्स हॉस्पिटलमध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आम्हा सर्वांसाठीच हे अत्यंत धक्कादायक असे वृत्त आहे. नांदेड जिल्ह्यातील राजकारणातील अनुभवी व्यक्तिमत्त्वाचे हे असे अचानक निघून जाणे हे खरं वाटत नाही. यासमयी आमचे कौडगावकर कुटुंबीय प्रा. रवींद्र चव्हाण, चव्हाण परिवार व नातेवाईकांच्या दु:खात सहभागी आहोत. दिवंगत आदरणीय स्ववसंतरावचव्हाणसाहेब यांना जड अंत: कारणाने भावपूर्ण आदरांजली. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**–तिरुपती वेताळे,सामाजिक कार्यकर्ते**

## योध्याची झुंज अपयशी

अखेर मृत्यू जिंकला जिल्ह्याचे खासदार ज्येष्ठ नेते कै.वसंतरावजी चव्हाण साहेब यांना भावपूर्ण श्रद्धांजली.


**–संतोष उत्तरवार**
**जिल्हा सचिव नांदेड**
**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

# शब्दसुमनांची आदरांजली

## माझे दादा..!

माझे वडील कालकथित तुकाराम केराप्पा भोरकडे ( प्राथमिक शिक्षक ) हे आता हयात नाहीत त्यांना जाऊन आज चोवीस वर्षे पूर्ण झाली आहेत,परंतु आजही प्रत्येक क्षणी त्यांची आठवण येते, त्यांची उणीव कधीच भरून निघणार नाही.

माझे दादा हे अतिशय मनमिळावू स्वभावाचे, प्रामाणिक, शिस्तप्रिय, नेहमी हसतमुख तसेच सर्वांना मदत करणारे असे एक आदर्श व्यक्ती होते, शिक्षक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले त्यांच्यावर चांगले संस्कार केले.. आज कित्येक विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत आहेत माझ्या वडिलांना अनेक तालुकास्तरीय, राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले होते, ते खरोखरच हाडाचा शिक्षक होते.



आमचं पाच जणांचं सुखी कुटुंब.. कोणालाही हेवा वाटेल असं होतं, माझे वडील शिक्षक, आई गृहिणी, आम्ही तिघे भाऊबहीण ..सगळं अगदी व्यवस्थित सुरू होतं, आमच्या दादांनी त्यांच्या मनमिळावू हसत स्वभावाने असंख्य माणसे जोडली होती, आमच्या घरात नेहमी चैतन्य असायचं, हसत खेळत वातावरण, थोडासा धाक पण असायचा दादांचा.... पण माझ्या दादांनी व आईने आमच्यावर जे उत्तम संस्कार केले आम्हाला घडविले त्याची परतफेड करणे या जन्मात तरी शक्य होणार नाही...

माझ्या वडिलांनी सोनेसांगवी, ता. शिरूर, जिल्हा. पुणे या गावामध्ये सोळा वर्षे नोकरी केली, त्यानंतर बुरुंजवाडी, ता. शिरूर, जिल्हा. पुणे येथे अनेक वर्षे शिक्षक म्हणून नोकरी केली, त्यांनी शिक्षणासोबतच सामाजिक पातळीवरही अनेक स्तुत्य उपक्रम राबविले होते... मी त्यांची मुलगी आहे याचा मला खरच खूप अभिमान वाटतो.

दादा चित्रकला, गायन, हस्ताक्षर, वक्तृत्व , लेखन, सर्वच गोष्टीत पारंगत होते, या सगळ्याची त्यांना खूप आवड होती... त्यांचे विचार एवढे सकारात्मक असायचे की समोरच्या व्यक्तीवर त्यांच्या बोलण्याचा खूप प्रभाव पडत असे... मी त्यावेळी लहान होते पण आजही मला सर्व गोष्टी लक्षात आहेत...

२८ ऑगस्ट २००० मध्ये दादांचे अपघाती निधन झाले त्यांच्या अचानक जाण्याने आमच्यावर तर दुःखाचा डोंगर कोसळला होता, यावर विश्वास बसतच नव्हता... ही घटना आमच्या आयुष्यातील अतिशय दुःखदायी होती... मला तर काय होतेय हे समजतच नव्हतं... सगळं आमच्या कल्पनाशक्तीच्या पलीकडे होतं.. दादांच्या अचानक जाण्याने फक्त आम्हालाच नाही तर संपूर्ण शिरूर तालुक्यातील लोकांना धक्का बसला होता.... गुरूजी हयात नाहीत यावर कोणाचाच विश्वास बसत नव्हता...

माझ्या दादांची लोक आजही आठवण काढतात, त्यांच्या सत्कार्यामुळे , माणुसकीमुळे, चांगुलपणामुळे आजही प्रत्येक माणसाच्या मनात आदराचे स्थान आहे, आजच्या मोबाईलच्या काळात लोकांना एकमेकांशी बोलायला वेळ नसतो, आठवण काढणे तर दूरची गोष्ट आहे... अशा काळात सुद्धा माझ्या दादांची लोक आठवण काढतात यावरूनच त्यांनी आयुष्यात किती माणसे जोडली होती हे कळते.. माझ्या दादांसारखं व्यक्तिमत्व शोधूनही सापडणार नाही... त्यांना शब्दात व्यक्त करणं खूप कठीण आहे.. जेवढं लिहू तेवढं कमी आहे...

माझ्या दादांचा आशीर्वाद सदैव आमच्या पाठीशी आहेत त्यांच्या संस्कारांची शिदोरी घेऊनच आम्ही आयुष्यात पुढे जात आहोत, प्रगती करत आहोत, हे सर्व पहायला दादा तुम्ही हवे होते... पण काळापुढे कोण काय करणार.. ? तुम्ही नेहमी आमच्यासोबतच आहात असच मला वाटतं... तुमची मुलगी आज कवयित्री, लेखिका, म्हणून नावारूपाला येतेय याचा तुम्हाला प्रचंड आनंद झाला असता ... म्हणून ही शब्दसुमने तुमच्या चरणी अर्पण करतेय ..

जगण्यासाठी दिले
दादा तुम्हीच बळ
मनात तुमची जागा
सदैव राहील अढळ

व्यक्तिमत्व तुमचे अष्टपैलू
प्रसन्न नेहमी तनमन
जपतोय आम्ही भावंडे
संस्कारांचे दिलेले धन

यावे पुन्हा जगात
कित्येकदा आम्हाला वाटते
आठवण येताच टचकन
डोळ्यात पाणी साठते

अभिमान वाटावा असेच
कार्य करीन मी सदा
तुमच्या पावलावर ठेवते पाऊल
आशीर्वाद द्या फक्त दादा

आदरांजली वाहण्यासाठी
शब्दसुमनेही कमी पडतील
व्यक्त करताना भावना
शब्दही माझे खरच रडतील..!

**रुपाली तुकाराम भोरकडे, शिक्रापूर, पुणे.**
**शिक्रापूर (बबनराव धायतोंडे)**

# वंजारी महासंघाचे अहिल्यानगर येथे दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन थाटात संपन्न

## सुसंस्कृत समाज व सामाजिक समतेला केंद्रित करणारे संमेन–गणेश खाडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

साहित्य संमेलने म्हणजे विचार मंथनाचे सर्वमान्य पीठ असून सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी व त्याचवेळी सामाजिक समतेला अधिष्ठित करण्यासाठी पूर्वापार संपन्नतेच्या दिशेने सक्षमपणे वाटचाल करीत आहेत सदरचे संमेलन आयोजन त्याच अनुषंगाने असून भागवत धर्माचे प्रचारक ,थोर प्रबोधनकार ,जगत विख्यात तत्त्वज्ञानी, समाज सुधारक , नवनिधी अष्ट सिद्धी प्राप्त राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या प्रेरणेतून अहिल्या नगरात मोठ्या दिमाखात दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन मान्यवर प्रतिभातांच्या उपस्थितीने व कृती रूप सहभागाने संपन्न झाले हा आनंद शब्दांच्याही पलीकडचा आहे असं मला प्रामाणिकपणे वाटतं. मूल्याधिष्ठित समाजसेवा आणि समता साधावयाची असेल तर साहित्य व साहित्यिक यांचे खेरीज दुसरा सन्मार्ग नाही ही माझी भावना आणि धारणा आहे म्हणूनच साधू संतांइतकीच साहित्यिक वर्गाची उंची माझ्या मनी अंतरी नित्याची राहिली आहे .असे भावोद्गार वंजारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रबोधनकार सुप्रसिद्ध साहित्यिक माननीय गणेशजी खाडे यांनी उपस्थित जनसमुदायासमोर संमेलनाच्या व्यासपीठावरून उद्घाटन समारंभावेळी व्यक्त केली . यावेळी व्यासपीठावर संमेलनाध्यक्षा माननीय प्रा. डॉ. संगीताताई घुगे उद्घाटक राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माननीय प्रा. डॉ. गजाननराव सानप मावळते अध्यक्ष तथा महासंघाचे जेष्ठ मार्गदर्शक कवी प्रा. वा. ना .आंधळे नगरचे आमदार माननीय संग्राम भैय्या जगताप स्वागताध्यक्ष राजकुमार आघाव निमंत्रक माननीय मल्हारी खेडकर नाशिकचे उद्योजक बुधाजीराव पानसरे प्राचार्य नवनाथ आघाव या मान्यवरांची उपस्थिती होती.



माननीय खाडे सर यांनी आपल्या मनोगतात पुढे म्हटले की अहिल्यानगरचे सांस्कृतिक व सामाजिक वैभव हे समाजसेवी असून समतेची कास धरणारी माणसं आणि येथील नेतृत्व पाहून मी मनोमन भारावलो आहे. अतिथी देवो भव हा या परिसराचा नखशि कांत धर्म असून तो मानवतेला समृद्धी देणारा आहे अशा परिसरात प्रज्ञावंतांचे होणारे वैचारिक मंथन निश्चितच समाजाला नवी दिशाने दिशा देणारे व क्रांती करणारे राहील. असे म्हणत संमेलनातील परिसंवाद कथाकथन कवी संमेलन याबरोबरच साहित्यिक व पत्रकार मान्यवरांना राष्ट्रसंत भगवान बाबांच्या नावाने साहित्यरत्न पुरस्कार देऊन गौरविण्याचे भाग्य वंजारी महसंघास या निमित्ताने लाभल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.शेवटी विविध सत्रातील सहभागी वक्त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देत मान्यवरांविषयी ऋण व्यक्त केले. आयोजकांमधून राजकुमार आघाव ,मल्हारी खेडकर ,अर्जुन वायभासे,घनशाम बोडके या गुणीजनांचा त्यांनी आवर्जून उल्लेख करीत धन्यवाद दिलेत. आणि संमेलन सर्वार्थाने यशस्वी झाले. आपले समाज समानतेचे उद्दिष्ट फळास आले याचे समाधानही त्यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधी जवळ आवर्जून नोंदवले.

# श्री संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळाच्या विविध योजनेचा महामेळावा

## बीड जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे यांचे आवाहन

### नाभिक समाजातील महिलांसाठी विविध कला कौशल्य प्रशिक्षण नोंदणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

श्री संत शिरोमणी संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्र नाभिक महामंडळ जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे यांच्या संकल्पनेतून संत सेना केशशिल्पी महामंडळाच्या विविध योजनांचा महामेळावा व नाभिक समाजातील महिला भगिनींसाठी स्वयंरोजगार विविध कला कौशल्य रोजगार प्रशिक्षण नोंदणी. दिनांक ३०. ८. २०२४ वार शुक्रवार रोजी जन शिक्षण संस्थान चक्रधर नगर, बीड या ठिकाणी आयोजन केले आहे. तरी या नाभिक समाज बांधव व भगिनींनी या महामेळाव्याचा लाभ घ्यावा असे अवाहन महाराष्ट्र नाभिक महामंडळ बीड जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे यांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण देश-विदेशात नामवंत असणारे सेलिब्रिटी हेअर आर्टिस्ट व समाज भूषण महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्राप्त श्री.उदय टक्के यांची प्रमुख उपस्थिती लाभलेली आहे . तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जनशिक्षण संस्थान चे अध्यक्ष उपेंद्र कुलकर्णी, संचालक गंगाधरजी देशमुख, ओबीसी महामंडळाचे राठोड साहेब, भोसले साहेब, कळसाने साहेब, जिल्हा खादी ग्रामोद्योग केंद्राचे फताटे साहेब, जिल्हा अग्रनी बँकेचे व्यवस्थापक बिजेंदु झा साहेब, दै दिव्य लोकप्रभाचे उपसंपादक नितीन क्षीरसागर व समाजातील जेष्ठ नागरिक यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.तसेच यां ठिकाणी थेट कर्ज योजनेचा शुभारंभ या होनार आहे आणि यां योजनेची नोंदणी पण या ठिकाणी होणार आहे. महिलासाठी विशेष कला कौशल्य योजनेचे नोंदणी करून घेण्यात येणार आहे. तरी समाज बांधवांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहुन या योजणांचा लाभ घ्यावा.



# पोलिस निरीक्षक किरण बिडवे याच्याकडुन विद्यार्थीनींना 'गुड टच, बॅड टच'चे धडे

## भोकरदन पोलिस ठाण्या अंतर्गत अवैध धंदे बंद करून जनमानसात कर्तव्यदक्ष ठरलेले पोलिस निरीक्षक किरण बिडवे-प्रा.संजय पैठणकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । शेख जफर**





देशात व राज्यात मुलींवरील अत्याचाराच्या सद्यस्थितीत घडणाऱ्या घटनांच्या पार्श्वभूमीवर श्री छत्रपती संभाजी विद्यालय तादुंळवाडीत सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी शाळेत 'भयमुक्त विद्यार्थिनी' हा उपक्रम राबविण्यात आला.
मुलींचे लैंगिक शोषण आणि छळापासून संरक्षण करण्यासाठी भोकरदन पोलिसांकडून सतत मोहीम राबवली जात आहे. परिसरातील शाळा, महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थीनींना 'गुड टच, बॅड टच' याविषयी समजावून सांगितले जात आहे, जेणेकरून कोणीही त्यांच्याशी गैरवर्तन केले तर त्यांना लगेच समजेल. पोलिस निरीक्षक किरण बिडवे यांनी विद्यार्थिनींशी मनमोकळेपणाने संवाद साधला. यावेळी मुलींना मार्गदर्शन करताना श्री. किरण बिडवे म्हणाले की, कोणत्याही परिस्थितीत मुलींनी घाबरून जाऊ नये. गुंडप्रवृत्तीच्या व त्रास देणाऱ्या लोकांचा प्रतिकार केला पाहिजे. टोल फ्री नंबरवर संपर्क केल्यास तात्काळ तुम्हाला मदत मिळेल. अनेक प्रसंगी आपणास मदतही केली जाते.
विद्यार्थिनींना अत्यंत मनमोकळेपणे बोलण्यास भाग पाडून त्यांनी विद्यार्थीनींनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली व त्यांच्या मनात पोलीस विभागाविषयी विश्वास निर्माण केला.भोकरदन पोलिस स्टेशनच्या हद्दीतील श्री छत्रपती संभाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तादुंळवाडीत जाऊन भोकरदन पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी विद्यार्थिनींना स्पर्शज्ञानाचे धडे दिले.घरातील व्यक्ती कोणी स्पर्श करते तेव्हा सुखद आणि सुरक्षित वाटते तो एक चांगला स्पर्श असतो, जसे की आई-वडिलांची मिठी, आजी-आजोबांचे प्रेम, खेळताना मित्रांचा स्पर्श हे सर्व मुलांना आनंददायी आणि सुरक्षित भावना देतात. हे गुड टच आहे. तर कोणीतरी अयोग्यरित्या आणि चुकीच्या ठिकाणी, नको त्या ठिकाणी स्पर्श करतो तेव्हा अस्वस्थ, वाईट वाटते. एखाद्याने शरीराला स्पर्श केला आणि कोणालाही सांगू नको असे सांगितले तर हे बॅड टच आहे. असा स्पर्श मुलींना टाळायचा असतो. आपल्यासोबत असे काही घडले तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. आपल्या पलकांना, नातेवाईकांना किंवा पोलिसांना म्हणजे आम्हाला माहिती द्यावी असे आवाहन यावेळेस किरण बिडवे (पोलिस निरीक्षक भोकरदन पोलिस स्टेशन) यांनी केले.
यावेळेस प्राचार्य संजय पैठणकर यांनी ही गुड टच बॅड टच विषयी मार्गदर्शन करून भोकरदन पोलिस ठाण्यात एक कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक लाभले असल्या मुळे अवैध व्यवसाय विरूद्ध त्यांनी घेतलेली कठोर कारवाई व भुमिकेमुळे सर्व सामान्य जन मानसात कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक ठरले आहेत. यावेळेस हसनाबाद पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक आहेर,सह भोकरदन ठाण्याचे पोलिस कॉ.संदीप भुतेकर,पो कॉ ज्ञानेश्वर जाधव सह विद्यालयाचे सह शिक्षक पी एम पाटील,प्रा भगवान जाधव,मोहित जयस्वाल,जनार्दन सुरासे,सौ उषाताई खैरे,संदीप थोरात,हरिदास गव्हाड,मुनिर शहा भंडारे सह शालेय विद्यार्थी,विद्यार्थिनी,पालक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत समर्थ विद्यालयाचा संघ प्रथम

## १७ व १९ वर्षे वयोगटात उदगीर तालुक्यात प्रथम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**



तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत समर्थ विद्यालयाचा संघ १७ व १९ वर्ष वयोगटात प्रथम आला आहे.
यशवंत विद्यालय, वाढवणा बु. सोबत १७ वर्ष वयोगटातील सामना समर्थ विद्यालय, एकूर्का रोड च्या खेळाडूंनी सलग दोन सेट जिंकून हे यश मिळविले आहे. १९ वर्ष वयोगटातील सामना उदगीर येथील शंकर माध्यमिक विद्यालया विरूद्ध समर्थ विद्यालय, एकुर्का रोड च्या संघाने दोन सेट जिंकून प्रथम आले आहे.
दोन्ही संघ जिल्हास्तरावर उदगीर तालुक्याचे नेतृत्व करणार आहेत. या यशाबद्दल संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी, पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्थासदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, प्रा. बी. एस. बाबळसुरे, रसूल पठाण, क्रिडा समन्वयक किरण हाळीघोंगडे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. तालुका क्रीडा समन्वयक म्हणून संतोष कोल्हे यांनी महत्वाची भुमिका बजावली पंच म्हणून सतिश पाटील, मेहमूद खान,अर्शद खान, आनंद जगताप, अल्हाबक्ष शेख यांनी काम पाहिले.

# शिवसेना भवनात जनता दरबारास उत्स्फूर्त प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**



लोणार शिवसेना भवनात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनी सुरू केलेल्या जनता दरबारास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे
सविस्तर वृत्त असे की लोणार येथील विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या व्यवस्थापक यांनी अनेक शेतकरी ज्यांनी त्या बँकेकडून पीक कर्ज घेतलेले आहे त्यांच्या खात्यावर होल्ड लावण्यात आले आहे जेव्हा की लोणार तालुका गतवर्षी दुष्काळग्रस्त घोषित झालेला असताना बँक शेतकऱ्यांच्या खात्यावर होल्ड लावू शकत नाही, त्यांना आलेल्या दुष्काळीची मदत, नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यास न देता त्यांचे अकाउंट होल्ड करून कर्ज भरण्यास दबाव आणत आहेत याकरिता विविध गावातून आलेल्या शेतकरी यांनी आपली कैफियत जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांच्याकडे जनता दरबारात मांडली त्या सर्व समस्या एकूण समजून डॉ.बछिरे यांनी बँकेशी संपर्क साधला व गतवर्षी लोणार तालुका दुष्काळग्रस्त घोषित असताना कर्ज परत फेडीसाठी शेतकऱ्यांना विधवा म्हणता येणार नाही, त्यांच्या खात्यावर होल्ड लावता येणार नाही हे खडसावून सांगितले व आलेल्या सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावरील होल्ड काढून शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची मदत विड्रॉल करून द्या तेव्हा व्यवस्थापकांनी बछिरे त्यांच्यासोबत आलेल्या सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावरील होल्ड काढून त्यांची रक्कम विड्रॉल करून दिली आणि शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. या जनता दरबारास बोरखेडी, सुलतानपूर, गंधारी, गायखेड, कुंडलस, रायगाव येथील शेतकरी यांनी आपली कैफियत मांडून त्यांच्या समस्या डॉ.बछीरे यांनी दूर केल्या याप्रसंगी शिवसेना तालुका उपप्रमुख परमेश्वर दहातोंडे, शहर प्रमुख गजानन जाधव, युवा शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, कृ. उ.बा.स.संचालक तेजराव घायाळ, राजू दहातोंडे व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते



**राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट राज्यसभा खासदार पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल सर्किट हाऊस व्ही.आय.पी गेस्ट हाऊस पुणे येथे व्याही बंधु नितीन काका जाधव पाटील यांचा सत्कार करताना मा.शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी समवेत प्रभाकर पाटील (मा.सरपंच सिंधीकर),राजपालजी देशमुख ढोकीकर यांच्यासह आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते.**

# शेतात जाण्यासाठी रस्ता देता का रस्ता

## हिवरसिंगा ग्रामस्थांचे तहसिलदार यांना निवेदन:- भिमराव सानप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

शिरुर (कासार)तालुक्यातील हिवरसिंगा येथील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी योग्य रस्ता नसल्याने ग्रामस्थांचे हाल होत आहेत. या मुळे शेतकरी आक्रमक झाले असून, मायबाप आम्हाला रस्ता देता का रस्ता अशी म्हणण्याची वेळ येथील ग्रामस्थावर आली आहे. तरी तहसिलदार शिरूर, बीडीओ शिरूर, ग्रामसेवक हे कुठलीच कार्यवाही करीत नसल्या कारणाने अखेर हिवरसिंगा अंतर्गत येणाऱ्या मुस्लिम वस्ती, कुटे वस्ती, सानप वस्ती, दूधाळ वस्ती येथील ग्रामस्थांनी तहसिलदार शिरूर (कासार), बीडीओ शिरूर कासार यांना लेखी तक्रार केली आहे. या लेखी तक्रारीत हिवरसिंगा ग्रामस्थांच्या वतीने भिमराव सानप यांनी म्हटले आहे की हिवरसिंगा गावापासुन दैनंदिन कामासाठी शेतात जावे लागते, परंतु रस्ता अतिशय खराब असल्या कारणाने या रस्त्यावर चालणे देखील शक्य नाही तर माल वाहतूक कुठून करणार त्या मुळे हिवरसिंगा ते जुना पौंडुळ रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी तहसिलदार शिरूर (कासार)व बीडीओ शिरूर (कासार)यांनी करून तात्काळ रस्ता दुरूस्त करून द्यावा असे दिलेल्या लेखी तक्रारीत भिमराव सानप व हिवरसिंगा ग्रामस्थांनी म्हटले आहे.



# वंजारी महासंघाचे अहिल्यानगर येथे दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन थाटात संपन्न

## साहित्य संमेलनाच्या निमित्ताने कृतज्ञ संस्मरणे : प्रा.वा.ना.आंधळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

मित्रहो! सविनय नमस्कार
'आम्हाला वगळा गतप्रभ जणी होतील तारांगणे'
'आम्हाला वगळा विकेल कवडी मोलावर हे जिणे'
कवीश्रेष्ठ केशवसुतांच्या या ओळी आठवल्या म्हणजे निदान माझी आत्मपरीक्षणापासून आत्मचिंतनाकडे वाटचाल नित्याचीच होत आलीय. कवी लेखक साहित्यिकांचं मोल आणि महत्व जर इतक्या आभाळ उंचीचं असेल तर आम्हाला समाजाचं सांस्कृतिक नेतृत्व करावं लागणार आहे. ही जबाबदारी आणि भानही अंगीकारावं लागतं. आणि त्याच दिशेने लेखणीला वाट करून द्यावी लागते.
वर्तमानी लिहिणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे ही एका दृष्टीने आनंदाची व स्वागतार्ह बाब आहे .पण त्याचवेळी आपण काय लिहितो कोणासाठी लिहितो निदान हा विचार अंतस्थ गडद झालाच पाहिजे. भवताल अनेक दुष्प्रवृत्तींनी ग्रासलाय माणूस भौतिक चंगळवादांनी व अघोरी स्पर्धांनी बरबटून निघतोय. या गोष्टी समाजाला अस्थिर व बेचैन करणाऱ्या असून त्यांना अवरोधणं ,संपवणं जर कोणाच्या हाती असेल तर ते फक्त प्रज्ञावंतांच्या हाती असतं.यासाठीची थोर परंपरा सुदैवानं या देशीय मातीतून जन्मली वाढली व वारसा घेऊन पुढे जात राहिली. त्याचाच समर्थ अनुनय करण्यासाठी अनेक प्रतिभावंत जागता पहारा देत लिहीते झाले आहेत.याची साक्ष साहित्य संमेलनात होणाऱ्या परिसंवादातून कथाकथनातून व कवी संमेलनातून तर प्रत्ययास येथेच येते. पण अध्यक्षीय भाषण व उद्घाटनपर भाषण हा एक समाजासाठी दिशा देणारा दस्तऐवज म्हणूनच पुढे येतो. ही सारी पर्वणी तुमच्या आमच्या भविष्यासाठी सुकर वाट म्हणूनच उभी ठाकते.
आत्मानंदासाठी लिहिता लिहिता माझं लेखन समाजाचा आनंद केव्हा झाला हे जेव्हा लिहिणाऱ्यालाही कळत नाही तोपर्यंत लेखनाचे तप मांडता आले पाहिजे. लेखनाची अव्याहत साधना करता आली पाहिजे. याचा प्रत्ययी प्रत्यय परवा अहिल्या नगरात संपन्न झालेल्या दुसऱ्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनातून मला आला. संमेलनाचे अध्यक्षा मा. डॉ. संगीताताई घुगे व उद्घाटक थोर शिक्षण तज्ञ विद्याभ्यासक माननीय डॉ. गजाननराव सानप तसेच महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रबोधनकार तथा सुप्रसिद्ध साहित्यिक गणेशजी खाडे यांनी आपल्या भाषणांमधून जे अष्टावधान मांडलं ते चिंतनशील व मर्मग्राही होते. समाजाला दिशा देणारे होते. मीमांसाआणि विवेचकता या अनुभूती श्रोत्यांच्या



हृदयस्थ होणाऱ्या होत्या. वैचारिक श्रीमंती काय व कशी असू शकते याचं सम्यक दर्शन या तिन्ही विद्वातांच्या भाषणातून काना मनापर्यंत गेलं. संमेलन फलश्रुतीची ही सुरुवातच मोठी आनंददायी झाली.
संमेलनातला महत्त्वाचा दुसरा टप्पा म्हणजे परिसंवाद कथाकथन आणि काव्यवाचन उद्घाटन समारंभातील विचार प्रवणतेच दुसरं दमदार पाऊल म्हणून परिसंवादाचे अधोरेखन मी आवर्जून करू इच्छितो. त्याचं कारणही तितकंच समर्पक व संयुक्तिक आहे ज्यांचे हाती विपुल ग्रंथ लेखनाचे सामर्थ्य आहे ते परीसंवादाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध संशोधक व समीक्षक प्रा. डॉ. शिवाजीराव नागरे यांनी प्रारंभीच परिसंवादाचा परिघ विषय वस्तूचे गांभीर्य व वर्तमानी प्रस्तुत विषयाची असलेली निकड सादर करीत परिसंवादाचा प्रारंभ केला. यात शिवाजी महाविद्यालय कन्नड येथील सुप्रसिद्ध समीक्षक कवी लेखक संशोधक तथा साहित्य चळवळीचे प्रणेते प्रा. डॉ. शिवाजीराव हुसे ,परभणी येथील सुप्रसिद्ध प्रवचनकार तथा प्रभावी वक्ते हरिभक्त परायण डॉ.विठ्ठलराव जायभाये छत्रपती संभाजीनगर येथून आलेले सुप्रसिद्ध वक्ते तथा समीक्षक प्राचार्य डॉ. रामकिशन दहिफळे ,मुंबई येथून आलेल्या आकाशवाणी मुंबई व दूरदर्शन मुंबईच्या वृत्त निवेदिका साहित्यिका रेखा शेळके संखे तसेच पुणे येथून आलेल्या कवयित्री सौ. प्रीती बेटकर यांनी सामाजिक समता व सुसंस्कृत समाजावर केलेले भाष्य या संमेलनाचा आत्मा ठरला असे म्हटल्यास वावगे होणार नाही. कथाकथन व कवी संमेलन या दोन्ही समारंभाने श्रोत्यांचे रंजना बरोबरच व्यवस्थित अंजन घालण्याचे काम फलश्रुतीकडे जाणारे होते. यात तुळशीराम बोबडे ,सौ .अलकनंदा आंधळे ,सौ रंजना सानप, सौ नीता सानप ,श्री मनोहर आंधळे श्री चंद्रकांत धस, श्री रमेश आव्हाड ,सौ. छाया जायभाये, डॉ विजयकुमार कस्तुरे, कु.प्रीती कायंदे ,श्री गुलाब राजा फुलमाळी, श्रीमती सुनिता कपाळे यांनी चांगलीच रंगत वाढवली व श्रोतृवृंदास खिळवून ठेवले.
सुरुची भोजनासह ग्रंथदिंडीचे केलेले भव्य दिव्य व आकर्षक नियोजन आणि सादरीकरण आयोजकांच्या संमेलन श्रद्धेचा सर्वोच्च मानबिंदू मला वाटला. आणि तितकाच भावलाही. या बाबतीत स्वागताध्यक्ष आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कुस्तीपटू राजकुमार आघाव निमंत्रक मल्हारी खेडकर सह स्वागत अध्यक्ष घनश्याम बोडके सह स्वागत अध्यक्ष अर्जुन वायभासे यांचे शर्थि चे प्रयत्न आम्ही उपस्थितांनी प्रत्यक्ष पाहून कृतकृत्य झाल्याचे समाधानही या निमित्ताने आम्हाला मिळाले.एकूणच सोहळ्याला पुरस्कार वितरण समारंभाने शोभासौष्ठव अधिक तेजोमयी झाले. यात साहित्यिक व पत्रकारांचा सन्मान चिन्ह व शाल देऊन गौरव करण्यात आला.
वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष माननीय गणेशजी खाडे सर यांनी जो विश्वास माझ्यावर दाखवित पहिल्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद दिले. नव्याने महासंघाच्या मार्गदर्शक पदी सन्मान देत नियुक्ती केली.त्या जबाबदारीस पुढे नेण्यासाठी मी कटिबध्द आहे.हे या निमित्ताने अधोरेखित करीत तिसऱ्या संमेलनाच्या दिशेने आपणा सर्वांना सोबत राहण्याचे नम्र आवाहनही करतो.

दैनिक लोकनेता



# उपमुख्यमंत्री अजित पवार,ना.धनंजय मुंडे,आ.पंकजाताई मुंडे व पोपटराव पवार यांच्या उपस्थितीत आज दुसऱ्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे लोकनेते माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून साकारलेले मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय दुसरे कृषी प्रदर्शनाचे उदघाटन आज आष्टी येथे होणार आहे.उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार,कृषी मंत्री व पालकमंत्री धनंजय मुंडे,भाजपाच्या नेत्या आ.पंकजाताई मुंडे,आदर्श सरपंच पोपटराव पवार,परभणी कृषी विद्यापिठाचे कुलगुरु डॉ. इंद्र मनी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलित श्री. छत्रपती शाहू,फुले,आंबेडकर कृषि महाविद्यालय यांच्या वतीने व शेतकऱ्यांचे नेते माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीत मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन आज होत आहे.गतवर्षी हे प्रदर्शन उशिरा झाले होते. परंतु यावेळी शेतकऱ्यांना रब्बी हंगामात काय पिके घेता येतील, त्याबद्दल सविस्तर मार्गदर्शन प्रदर्शनातून मिळणार आहे.दिड लाखावर शेतकरी कृषी प्रदर्शनाचा लाभ घेतील असा अंदाज आहे. कृषी प्रदर्शानाच्या निमित्ताने सांगली येथील व देशातील सर्वात उंच ४१ लाख रुपये किमंतीचा खिलार कोसा जातीचा सोन्या बैल प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने चार दिवस दररोज दुपारी १२ ते २ या वेळेत कृषी संबंधित तज्ञांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे.कृषी प्रदर्शनासाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या नावांमधून दर तासाला लकी ड्रॉ काढण्यात येईल व लकी शेतकऱ्यांला शेती उपयोगी भेट वस्तू देण्यात येईल. शेवटच्या दिवशी बंपर लकी ड्रॉ काढुन विजेत्याला बक्षीस दिले जाईल.कृषी प्रदर्शनात जिरेनियम शेती,खेकडा पालन,गोमातेच्या शेणापासून विविध वस्तू कशा निर्माण करायच्या यांची माहिती मिळणार आहे.महिलांनी घरबसल्या घरगुती व्यवसाय करणे,विविध प्रकारचे ट्रॅक्टर व अवजारे,दुध उत्पादक शेतकऱ्यांसाठी वेगवेगळे अत्याधुनिक मशिन, कुक्कुटपालन माहिती तसेच बँके मधून लोन कसे काढायचे याची माहिती मिळेल.गांडूळ खत बनविने मार्गदर्शन, खवय्यांसाठी विदर्भ,कोकण,मराठवाडा,पश्चिम महाराष्ट्र या भागातील खाद्यपदार्थ खाण्यासाठी व विक्री साठी स्टॉल उपलब्ध असणार आहे.शेतकऱ्यांच्या मनोरंजनासाठी रोज सायंकाळी शाळा,महाविद्यालयतील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमाअंतर्गत पारंपारीक लोकगीते,लोककला,नाटक, शास्त्रीय संगीत,शेतकरी गीते, लोकनृत्य यांचे सादरीकरण करण्यात येतील.लाडक्या बहिणींसाठी उद्धव के.पी.प्रस्तूत महाराष्ट्रभर गाजत असलेला महिला भगिनींचा एकमेव आवडता कार्यक्रम खेळ पैठणीचा शुक्रवार दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी होत आहे.यासाठी रोख स्वरुपात बक्षीस रक्कम व मानाची पैठणी, याशिवाय इतर भरपुर बक्षिसे जिंकण्याची व विविध खेळ खेळण्याची संधी आहे.गतवर्षी एकुण १०० स्टॉल होते यावर्षी १५० स्टॉल राहतील. शेतकऱ्यांच्या सोबत लहान मुले येतात त्यांच्या मनोरंजनाची सोय करण्यात आली आहे.गेल्या प्रदर्शनापेक्षा यावेळी मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होणार आहे.कृषी प्रदर्शनाचा समारोप अ.भा.वारकरी संप्रदायाचे ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले व गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत एक सप्टेंबर रोजी होणार आहे.हे प्रदर्शन संपूर्ण मोफत आहे,त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे,स्वागतोत्सुक युवा नेते अजयदादा धोंडे,अभयराजे धोंडे, चेअरमन राजेश धोंडे,कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आरसुळ एस.आर.,व्यवस्थापक बंडु पाचपुते,गणेश जठार व कमिटीने केले आहे.

# पुतळाच नव्हे तर अस्मिता देखील कोसळली असून संबंधितावर तात्काळ कारवाई करा

## विशाल आस्वार यांनी पाठवले मुख्यमंत्र्यांना पत्र

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी । कौतिक हिवाळे**



गेल्या काही दिवसांत महाराष्ट्रात महिला व लहान मुलींवरील अत्याचाराने राज्य हादरून गेले असताना मालवण मधील राजकोट किल्ल्यावरील महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा खाली कोसळला आहे.यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात प्रचंड चीड निर्माण झाली असून सगळीकडे राग व्यक्त होत आहे.अवघ्या काही महिन्यांपूर्वीच नौदल दिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते.तोच पुतळा काल रात्री कोसळला अन त्या सोबत कोसळली महाराष्ट्राची अस्मिता अन शान याबाबत ज्यांनी पुतळा बसविला ज्याने बनवला त्या सर्वांवर अन सर्वच यंत्रणांवर संबंधित खात्यातील अधिकारी सर्वांवर गुन्हे दाखल करण्यात येऊन त्यांना कडक शिक्षा द्यावी याबाबतीत केंद्रीय पत्रकार संघाच्या वतीने जालना जिल्हाध्यक्ष विशाल असवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याबाबत पत्र पाठवले असून तात्काळ दोषींवर कारवाई करुन त्या ठिकाणी परत दर्जेदार छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा तातडीने बसविण्यात यावा अशी विनंती देखील करण्यात आली आहे.

# पोलीस उपनिरीक्षक अक्षय पाटील यांना विशेष सेवा पदक प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल सुनिल हावा**



लातूर जिल्हा पोलीस दलात उदगीर शहर पोलीस स्टेशन येथे कर्तव्यावर असलेले, कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक अक्षय माधवराव पाटील यांना विशेष सेवा पदक प्रदान करण्यात आले.गडचिरोली जिल्ह्याच्या नक्षल वाद्यांच्या हिंसक व बेकायदेशीर कारवायां ना आळा घालण्यास दिलेल्या योगदानाबद्दल गृह विभाग महाराष्ट्र राज्य मा.पोलीस महासंचालक यांचे विशेष सेवा पदक जाहीर झाले.सन २०२० ते २०२३ काळात गडचिरोली जिल्ह्यात अतिशय दुर्गम भागात नक्षलवाद्यांच्या बेकायदेशीर कारवायांना परिणामकारक आळा घालत विहित कालावधी पूर्ण केले असल्यामुळे यांना विशेष सेवा पदक जाहीर झाले.

सन २०२२ मध्ये केंद्र शासनाचा अंतरिक्ष सुरक्षा सेवा पदक पण मिळालेला आहे.१५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे मा. ना. श्री संजय बनसोडे मंत्री क्रीडा व युवक कल्याण, बंधारे महाराष्ट्र राज्य व जिल्हाधिकारी श्रीमती वर्ष ठाकूर घुगे मॅडम पोलीस अधीक्षक श्री सोमय मुंडे तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत गडचिरोली येथे केलेल्या कामगिरी बद्दल विशेष सेवा पदक प्रदान करण्यात आले.अक्षय पाटील यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# घाटा पिंपरी येथील सरपंच मोहन आमटे यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा आष्टीत सत्कार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी तालुक्यातील पिंपरी घाटा गावचे सरपंच मोहन कुंडलिक आमटे यांनी ग्रामपंचायत क्षेत्रातील विविध प्रकारचे सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांची दखल घेऊन स्वराज्य सेवा संघाच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.यानिमित्त ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष तथा दिव्यांग कर्मचारी संघटनेचे तालुका अध्यक्ष माननीय श्री नवनाथ लोंढे,गणप्रमुख बिट्टू पोकळे,रामेश्वर भवर,सुनील साळवे आदींनी सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.तसेच त्यांचा अजून तालुक्यातून विविध क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# गावडे विद्यालयातील अजिंक्यची जिल्हास्तरावर कुस्ती स्पर्धेसाठी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा क्रिडा परिषद अंतर्गत शिरूर तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत मा.बापुसाहेब गावडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी डोंगरगण गावचा पैलवान अजिंक्य अशोक चोरे (१७ वयोगट) याची ६० किलो वजनी गटात पुणे जिल्ह्यासाठी निवड झाली आहे.

आंबळे (ता.शिरूर ) या ठिकाणी माध्यमिक विद्यालयातील शालेय कुस्ती स्पर्धा नुकत्याच आयोजित केल्या होत्या.यावेळी झालेल्या अटीतटीच्या लढतीत पैलवान अजिंक्य चोरे याने यश संपादन केल्याने त्याची जिल्हा पातळीवर निवड झाली आहे.अजिंक्य याला प्रशिक्षक म्हणून शिरूर केसरी पै.नवनाथ चोरे यांची साथ मिळाली,यशाची गुरुकिल्ली, कुस्तीचे बाळकडू मामा पैलवान स्वप्निल म्हतू गावडे यांच्याकडून मिळाले असून गावडे विद्यालयाचे नाव तालुक्यात अभिमानाने उंचावल्याबद्दल विद्यालयाचे आदर्श प्राचार्य

**आई– वडिलांची साथ,मामाचे सहकार्य, प्रशिक्षकाचे पाठबळ, प्राचार्य यांचे मनोबल या सर्वांमुळे मी हे यश संपादन करू शकलो आहे,पुढील स्पर्धेत देखील शाळेचे नाव उंच शिखरावर नेवून ठेवेल अशीच कामगिरी करणार आहे.–पै.अजिंक्य चोरे (विद्यार्थी –जिल्हा निवड)**

आर.बी.गावडे यांनी अभिनंदन केले आहे.जिल्ह्यात देखील त्याची नक्कीच निवड होईल असा आत्मविश्वास देखील प्राचार्य गावडे यांनी व्यक्त केला.या निवडी बद्दल परिसरातून अजिंक्यवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.त्याच्या या यशाबद्दल विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार पोपटराव गावडे,संस्थेचे सचिव राजेंद्र गावडे,सहसचिव सूनिता गावडे,व्यवस्थापकीय संचालक शिक्षक अजित गावडे,शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी देखील पैलवान चोरे याचे अभिनंदन केले.



# सरस्वती विद्यालय सरस्वती इंग्लिश स्कूल मध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी

## या शाळेमध्ये प्रत्येक सण आनंदात साजरी करण्यात येतो कारण सणाविषयी आवड व माहिती प्राप्त होते

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथे सरस्वती विद्यालय व सरस्वती इंग्लिश स्कूलमध्ये दहीहंडी उत्सवाचे पूजन शाळेचे अध्यक्ष राजेंद्र देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले या शाळेमध्ये प्रत्येक सण उत्साहामध्ये साजरा करण्यात येतात कारण विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण होतो सणाविषयी आवड निर्माण होते आणि त्या सणाविषयी माहिती प्राप्त होते आपल्या भारतीय संस्कृती मुळे प्रत्येक सण आनंदात साजरी करतो कारण या सणाविषयी विद्यार्थ्यांना सखोल माहिती असायला पाहिजे म्हणून या विद्यालयांमध्ये प्रत्येक सण सहज साजरा करण्यात येतो. शाळेचे अध्यक्ष साहेबांनी चिमुकल्यांचा उत्साह वाढवण्यासाठी बक्षीस जाहीर करून विजयी गोविंदांना अध्यक्षांच्या हस्ते बक्षीस प्रधान करण्यात आले यावेळी शाळेचे पालक एन एम लोखंडे सर, शासकीय अधिकारी ए के बावस्कर सर, सेमी माध्यम मुख्याध्यापक डी टी खंडाळकर सर, इंग्लिश माध्यम प्रिन्सिपल गोरे सर, उपमुख्याध्यापक मनोज देशमुख सर, व शाळेचा पूर्ण स्टॉप कर्मचारी वृंद उपस्थित होते.





**आपल्या भारतीय संस्कृती व आपल्या भारतीय संस्कृती च्या माध्यमातून प्रत्येक सणाचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये रुजावले गेले पाहिजे त्याकरिता वेळोवेळी शाळेच्या माध्यमातून आम्ही प्रत्येक सण उत्साहामध्ये या शाळेमध्ये साजरा करतो व विद्यार्थ्यांना त्या सणाचे महत्त्व त्यांना सांगतो..**

**–शाळेचे अध्यक्ष,राजेंद्रजी देशमुख**

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904